डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक वाचनालय पुरस्कार प्राप्त

*वाचनसंस्कृती आणि आधुनिकता यांचा संगम असलेले*

# “अजिवा”

## अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

स्थापना : १८३८

# १८२ वा वार्षिक अहवाल

## सन २०१९-२०२०

भावपूर्ण . . .



# श्रध्दांजली

**संस्था व वाचनालयाचे आजीव सभासद,वाचक सभासद,**

**हितचिंतक तसेच साहित्य, समीक्षा, नाट्य, संगीत**

**अध्यात्म, लष्कर, देशभक्त, तत्वज्ञ, समाजकारणी**

**राजकारणी व ग्रंथालय चळवळ**

**इत्यादी क्षेत्रात भारतातील**

**ज्या थोर व्यक्तींनी आपल्या पराक्रमाने**

**भारताची शान वृध्दिंगत केली,**

**अशा संपन्न व समृध्द दिवंगत व्यक्तीमत्वांना**

# भावपूर्ण श्रध्दांजली

**अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )**

**व सावेडी वाचनालय**

**अहमदनगर**

**२०१९ - २०२०**

रजि.नं.-पी.टी.आर.ई.-१३

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## * विश्वस्त मंडळ *

## सन २०१६-१७ ते २०२०-२१.


| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. शिरीष मोडक | अध्यक्ष |
| २. | शिल्पा रसाळ | उपाध्यक्षा |
| ३. | श्री. अजित रेखी | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. विक्रम राठोड | प्रमुख कार्यवाह |
| ५. | श्री. तन्वीर खान | खजिनदार |
| ६. | डॉ. राजा ठाकूर | सह कार्यवाह |
| ७. | श्री. अनिल लोखंडे | सदस्य |
| ८. | प्रा. मेधा काळे | सदस्या |
| ९. | श्री. राहूल तांबोळी | सदस्य |
| १०. | श्री. अनंत देसाई | सदस्य |
| ११. | श्री. दिलीप पांढरे | सदस्य |
| १२. | प्रा. सौ. ज्योती कुलकर्णी | सदस्या |
| १३. | श्री. संजय चोपडा | सदस्य |
| १४. | डॉ. शैलेंद्र पाटणकर | सदस्य |
| १५. | श्री. किरण आगरवाल | सदस्य |

निमंत्रित सदस्य :-

१.श्री. चंद्रकांत पालवे  २.श्री. गणेश अष्टेकर

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

## *कर्मचारी वृंद*

| | |
|---|---|
| श्री.अमोल इथापे (बी.ए.एम.लिब.) | - ग्रंथपाल |
| श्री.नितीन भारताल (बी.कॉम,बी.लिब.) | - सहा. ग्रंथपाल |
| कु.पल्लवी कुक्कडवाल (बी.ए.बी.लिब.) | - निर्गम सहाय्यक |
| सौ.वर्षा जोशी | - लिपिक |
| सौ.अलका घबाडे | - शिपाई |
| श्री.विठ्ठल शहापूरकर | - शिपाई |
| श्री.सिंकदर शेख | - ग्रंथालय सहाय्यक |
| कु.कुमार गोटंला | - ग्रंथालय सहाय्यक |
| कु.संकेत फाटक | - ग्रंथालय सहाय्यक |
| श्री.संजय गाडेकर | - ग्रंथालय सहाय्यक |
| सौ.उमा देशपांडे | - (सावेडी वाचनालय) प्र.ग्रंथपाल |

### अहमदनगर जिल्हा वाचनालय
### *पदसिध्द ग्रंथालय शासन समिती*

मा.शालिनी गो इंगोले
प्र.ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.शिरीष मोडक<br>अध्यक्ष | श्री.विक्रम राठोड<br>प्रमुख कार्यवाह | शिल्पा रसाळ<br>उपाध्यक्षा | श्री.अजित रेखी<br>उपाध्यक्ष |
| श्री.किरण आगरवाल<br>सदस्य | श्री.तन्वीर खान<br>खजिनदार | डॉ.राजा ठाकूर<br>सहकार्यवाह | श्री.राहुल तांबोळी<br>सदस्य |

| | | |
|---|---|---|
| श्री.दिलीप पांढरे<br>सदस्य | श्री.अमोल इथापे<br>ग्रंथपाल,जिल्हा वाचनालय | सौ.उमा देशपांडे<br>प्र.ग्रंथपाल, सावेडी वाचनालय |

**अहमदनगर जिल्हा वाचनालय व सावेडी वाचनालय, अहमदनगर.**

*हिशोब तपासनीस*

**श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी, अहमदनगर.**

रजि.नं.पी.टी.आर.इ - १३ दिनांक : १०/१२/२०२०.

# अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था)

सन २०१९ -२०२० च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
(फक्त विश्वस्त संस्था सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्थेची सन २०१९ - २०२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७/१२/२०२० रोजी सकाळी ठिक ११ वा. जिल्हा वाचनालयाच्या लो. टिळक सभागृहात संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी आपण सदर सभेस वेळेवर उपस्थित राहवे, ही विनंती.

**⁎ विषय :-**

(१) मागील सर्वसाधारण सभा दि.१५ / १२ / २०१९ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(२) सन २०१९ - २०२० चा अहवाल कायम करणे.
(३) हिशोब तपासनीस श्री.के.जी.सप्तर्षी ॲण्ड कंपनी यांचे कडून तपासून आलेल्या सन २०१९ - २०२० चा जमाखर्च, ताळेबंद,पत्रकास मंजूरी देणे.
(४) विश्वस्त संस्था व वाचनालयाच्या सन २०२० -२०२१ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
(५) सन २०२० - २०२१ सालासाठी हिशोब तपासनीसांची नेमणूक करणे.
(६)सभासदाकडे बाकी असलेले व परत न आलेली यादी प्रमाणे पुस्तके बाद करणे व त्यांचे डिपॉझीट फॉरफीट करणे बाबत.
(७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

आपला,
**विक्रम राठोड,**
प्रमुख कार्यवाह,
अहमदनगर जिल्हा वाचनालय, (विश्वस्त संस्था )

---

**टिप** : १. सभेचे कामकाज संस्थेच्या घटनेतील नियमानुसार होईल.
२. सभेस आवश्यक गणपूर्ती न झाल्यास नियमांनुसार अर्ध्या तासानंतर सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल.यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. २४/१२/२०२० रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत वाचनालयाचे ऑफिसमध्ये आणून द्यावेत. आयत्या वेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सूचना** - १. सन २०१९ - २०२० चा वार्षिक अहवाल व सन २०१९-२० च्या जमा खर्चाची व उत्पन्न खर्चाची पत्रके वाचनालयाच्या www.ajivalibrary.org या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. कृपया नोंद घ्यावी.
२. आपण आपला ई-मेल व मोबाईल नंबर पूर्ण पत्यासह वाचनालयात कळवावा.

# अध्यक्षीय निवेदन

**सन्माननीय बंधू भगिनीनो......**

**अहमदनगर जिल्हा वाचनालय व विश्वस्त संस्थेचा सन २०१९ - २०२० चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे.**

वाचन संस्कृती समृद्ध करण्याची १८२ वर्षाची परंपरा असलेल्या वाचनालयाची प्रगती दिवसेंदिवस वेगाने होत आहे. या संस्थेत वाचनालयाचे विश्वस्त मंडळ, स्टाफ व सर्वच अजिव सभासदांच्या सहकार्याने मार्गदर्शनाने वाचनालय परिश्रमपूर्वक वाचन संस्कृती रुजवण्याचे व वृद्धींगत करण्याचे कार्य अविरीत करीत आहे. हे या वाचनालयाचे वैशिष्ट्य होय. महाराष्ट्रात सर्वात जुन्या असलेल्या या वाचनालयात आज सुमारे १ लाख १५ हजार पुस्तके आहेत. तसेच ३ हजार ५०० वाचक सभासद वाचनाचा लाभ घेत आहेत. आपल्या ऐतिहासिक अहमदनगर शहरात अहमदनगर जिल्हा वाचनालय दिमाखात कार्यरत आहे. यांचा आनंद होत आहे. संस्थेचा मुख्य उद्देश वाचन साहित्याचा संग्रह करणे, जपणूक करणे त्याचा प्रचार करून वाचन संस्कृती वाढविण्यासाठी सर्वांना प्रोत्साहन देणे. असा असल्याने वाचन साहित्याच्या किमंती किती ही वाढल्या तरी वर्गणीदारांसाठीच्या वर्गणीमध्ये गेल्या ९ वर्षापासून अजिबात वाढ केली नाही हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

संपूर्ण जगाला करोना व्हायरस (कोव्हीड १९) या आजाराने जेरीस आणले संपूर्ण जगात सुमारे १४ लाख लोक मृत्युमुखी पडले. सगळे अर्थचक्र थंडावले. अशा परिस्थितीत शासकीय आदेशानुसार महाराष्ट्रातील सुमारे १२ हजार वाचनालये २० मार्च २०२० ते १४ ऑक्टोबर २०२० पर्यंत बंद ठेवावी लागली. वाचकांची सतत विचारपूस सुरु असे पण नाइलाजास्तव वाचनालये सुरु करता येत नव्हते. १५ ऑक्टोबर २०२० पासून महाराष्ट्रातील सर्व वाचनालये सूरु करण्यास शासनानी मंजुरी दिली.

सन २०१९ - २०२० या वर्षात मुक्तद्वार विभागात रोज मराठी, हिंदी, इंग्रजी, भाषेतील १९ वर्तमानपत्रे घेण्यात आली. तर रु. १,८०,४६७ ची मराठी, इंग्रजी, पुस्तके व रु, १,०९,८२४/- ची नियतकालिके घेण्यात आली. ऐन दिवाळीत वाचकांसाठी विविध विषयांवरील ४५० दिवाळी अंक अल्प शुल्कात उपलब्ध करून देण्यात आले. अशाप्रकारे दर्जेदार वाचन साहित्य वाचकांना अव्याहतपणे पुरवण्यात आले आहे.

जलसंधारण मंत्री मा. ना. शंकरराव गडाख वाचनालय भेटी दरम्यान यांच्याकडून वाचनालयास दर्जेदार मराठी पुस्तके घेण्यासाठी देणगी रुपात रोख २१०००/- मिळाले. वाचनालयाचे वतीने मा. ना. शंकरराव गडाख यांचे मनः पूर्वक आभार.

अहमदनगर जिल्ह्यात सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात नावजलेल्या अ.नगर जिल्हा वाचनालयात अहवाल वर्षात अनेक उपक्रम राबविण्यात आले. राष्ट्रीय सण, जयंती, पुण्यतिथी, याच बरोबर अनेक स्पर्धा, परिसंवाद, व्याखाने, विनोदी लघुकथालेखन स्पर्धा वाचन प्रेरणा दिन, पुस्तक दिन, महिला दिन, मराठी भाषा दिन, यांचा समावेश होतो. याला सर्वच थरातून उत्तम प्रतिसाद लाभला. अशा समारंभामुळे वाचनालय सतत जनतेपुढे आल्याने वाचक संख्येत नेत्रदीपक वाढ झालेली दिसत आहे.

संस्था फक्त शहरातच कार्य करीत ते असे नसून जिल्ह्यातील ग्रामग्रंथालयात मार्गदर्शन करणे व प्रोत्साहन देण्याचे कार्य व मदत नियमितपणे करीत आहे. गांव तेथे वाचनालय या शासनाच्या धोरणानुसार वाचनालय ग्रामग्रंथालयाच्या जडणघडणीत मोलाचे सहकार्य देत आहे.

आमच एक स्वप्न सत्यात उतरत आहे. सावेडी परिसर नगरच्या औद्दोगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासा बरोबर खूपच अग्रेसर राहिला. तेथील नागरिकांची वाचनालयाची मागणी होती. १ ऑगस्ट २०१० पासून सावेडी वाचनालय सुरु आहे. अहमदनगर जिल्हा वाचनालयास महानगरपालिका यांच्याकडून सावेडी परिसरात वाचनालय विकसित करण्यासाठी भूखंड मिळाला आहे. वाचनालय महानगरपालिकेचे मनः पूर्वक आभार व्यक्त करीत आहे.

वाचन वृद्धीसाठी प्रोत्साहन देत असताना लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट साहित्य कृतीस पुरस्कार देणे सुरु असून गेल्या चार वर्षापासून कै.पद्माकर डावरे स्मृति विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा श्री. रविंद्र डावरे यांचे सहकार्याने राज्यस्तरीय विनोदी मराठी लघुकथा लेखन स्पर्धा घेण्यात येत आहे. यास चांगला प्रतिसाद लाभला विजयी स्पर्धकांना समारंभ पूर्वक पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या वर्षी आमचे वाचनालयाचे आधारस्तंभ अनिल भैय्या राठोड यांचे निधन झाले. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यात अहमदनगर जिल्हा वाचनालयास त्यांचे मोलाचे सहकार्य होते. त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मा. प्र. ग्रंथालय संचालक शालिनी गो. इंगोले, मुंबई मा, प्र. सहाय्यक ग्रंथालय संचालक सौ.कविता महाजन, नाशिक तसेच अ.नगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. अशोक गाडेकर, तांत्रिक सहायक हनुमान ढाकणे, निरीक्षक रामदास शिंदे, शैलेश घेघडमल तसेच आर. आर. आर. फौंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री. अनंत वाघ यांचे वाचनालयास वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले व लाभत आहे. वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष श्री. अजित रेखी, खजिनदार श्री.तन्वीर खान, सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर या पदाधिकाऱ्याच्या कार्यकौशल्याने वाचनालय प्रगती करीत

आहे. याच बरोबर श्री. राहुल तांबोळी, प्रा.ज्योती कुलकर्णी, श्री.किरण आगरवाल, श्री. दिलीप पांढरे श्री. अनंत देसाई, श्री.अनिल लोखंडे, श्री.संजय चोपडा, प्रा.मेधा काळे, डॉ.शैलेंद्र पाटणकर, त्याचप्रमाणे समिती सदस्य श्री. चंद्रकांत पालवे, श्री. गणेश अष्टेकर अशा उत्साही सदस्यांच्या परिश्रमाने वाचनालयात राबविण्यात आलेले सर्वच उपक्रम जोमाने व उत्साहात पार पडले.

या सर्वांचे अभिनंदन व आभार. ग्रंथपाल श्री. अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल श्री. नितीन भारताल, कु.पल्लवी कुक्कडवाल, सौ. अलका घबाडे, सावेडी वाचनालयाचे सौ. उमा देशपांडे व सर्व कर्मचारी यांच्या मेहनतीने अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. हे सर्व करीत असताना वाचनालयाच्या कार्याला आपल्या लोकप्रिय दैनिकातून योग्य ती प्रसिद्धी देण्याचे मौलिक काम केलेल्या वृत्तपत्राचे संपादक, पत्रकार बंधू, केबल चालक यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. तसेच वाचक सभासद, आजीव सभासद, देणगीदारं, हितचिंतक यांच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार व धन्यवाद !

**प्रा. शिरीष मोडक**

**अध्यक्ष**

**अहमदनगर जिल्हा वाचनालय (विश्वस्त संस्था),अहमदनगर.**

# सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम २०१९-२०२०

सन २०१९ - २०२० या आर्थिक वर्षात वाचनालयाच्या वतीने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम हिरीरीने राबविण्यात आले. समाजमनात वाचनालयाची प्रतिमा उंचावण्यासाठी सामाजिक बांधिलकीतून सर्व वाचकांसाठी, नागरिकांसाठी राष्ट्रीय सण, सत्कार, मान्यवरांची जयंती, पुण्यतिथी, व्यक्तिमत्व विकास शिबीर, उद्घाटन, विविध स्पर्धा असे उप्रकम वर्षभर राबविण्यात आले या सर्व उपक्रमांना प्रतिसाद लाभला.

## *सन २०१९-२०२० जयंती, पुण्यतिथी संपन्न :-

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने मान्यवर थोर महापुरुषांची व थोर महिलांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्या त्या थोर व्यक्तीना नम्र अभिवादन करून त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

**(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती :**

रविवार, १४ एप्रिल,२०१९

**(२) लोकमान्य टिळक व अण्णाभाऊसाठे जयंती :**

गुरुवार, ०१ ऑगस्ट,२०१९

**(३) राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती :**

बुधवार, ०२ ऑक्टोबर,२०१९

**(४) पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती-बालदिन :**

गुरुवार,१४ नोव्हेंबर,२०१९

**(५) महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी :**

गुरुवार,२८ नोव्हेंबर,२०१९

**(६) भारत डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन :**

शुक्रवार,६ डिसेंबर,२०१९

**(७) सावित्रीबाई फुले जयंती - महिला मुक्तिदिन :**

शुक्रवार,०३ जानेवारी,२०२०

**(८) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती :**

गुरुवार,२३ जानेवारी,२०२०

**(९) महात्मा गांधी पुण्यतिथी :**

गुरुवार,३० जानेवारी,२०२०

**(१०) छत्रपती शिवाजी महाराज जयंती :**

बुधवार,१९ फेब्रुवारी,२०२०

**(११) स्वा.सावरकर स्मृतिदिन :**

बुधवार,२६ फेब्रुवारी,२०२०

## * राष्ट्रीय सण समारंभ व ध्वजवंदन :-

**बुधवार दि. १ मे, २०१९ - महाराष्ट्र दिन - कामगार दिन**

**गुरुवार दि. १५ ऑगस्ट, २०१९ - भारतीय स्वातंत्र्य दिन**

**रविवार दि. २६ जानेवारी २०२० - भारतीय गणराज्य दिन**

दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात वाचनालयात वरील राष्ट्रीय महत्वाचे समारंभ उत्साहात व थाटात साजरे करण्यात आले. या समारंभास अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह श्री. विक्रम राठोड, उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, सहकार्यवाह श्री. डॉ.राजा ठाकूर , संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, संचालक किरण आगरवाल, दिलीप पांढरे, डॉ. राजा ठाकूर, श्री. अनंत देसाई,श्री. राहूल तांबोळी, श्री.चंद्रकांत पालवे, श्री. गणेश अष्टेकर ग्रंथपाल अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल नितीन भारताल व सर्व कर्मचारी वर्ग तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

## * २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन साजरा: मंगळवर २३ एप्रिल, २०१९

अहमदनगर जिल्हा वाचनालयात २३ एप्रिल २०२० रोजी पुस्तक दिन साजरा करण्यात आला. प्रा.शिरीष मोडक यांनी सर्वात प्रथम शेक्सपिअर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.या प्रसंगी जेष्ठ साहित्यका प्रा.मेधा काळे यांनी शेक्सपिअर विषयी माहिती दिली. पुस्तकांचे महत्व विशद केले. या प्रसंगी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, सहकार्यवाह उदय काळे, संचालक राहुल तांबोळी, किरण आगरवाल, प्रा.ज्योती कुलकर्णी, दिलीप पांढरे, कर्मचारी,पालक उपस्थित होते.

## * बुधवार १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिना निमित्त हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण :

१ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून वाचनालयात हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी उपाध्याक्ष अजित रेखी अध्यक्ष स्थानी होते. त्यांनी या प्रसंगी आपले मौलिक विचार मांडले. या कार्यक्रमाला सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, ग्रंथपाल व वाचक उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला शुभारंभ मंगळवार २८ मे, २०१९ :**

**<u>वक्ते :- श्री. बण्डा जोशी, विषय - खळखळाट (विनोदी एकपात्री प्रयोग. )</u>**

दर वर्षीप्रमाणे वाचनालयाच्या वतीने २८ मे २०१९ ते ३१ मे २०१९ असे ४ दिवस सलग विविध विषयांवरील नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेचे उद्घाटन माजी. आमदार व शिवसेनेचे उपनेते मा. श्री. अनिल भैय्या राठोड यांच्या हस्ते झाले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी मा.श्री अशोक गाडेकर, व्याख्याते मा. श्री. बण्डा जोशी (पुणे), यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.शिरीष मोडक यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी करून दिला. बण्डा जोशी (पुणे)म्हणाले की आज विविध ताणतणावामुळे माणूस हसायचा विसरून गेला आहे. खळखळून हसताना माणूस सुंदर दिसतो असे सुंदर चेहरे पाहण्याचे भाग्य मला लाभले जो खळखळून हसतो तो ईश्वराची प्रार्थना करतो आणि जो दुसऱ्यांना हसवतो त्यांच्यासाठी ईश्वर प्रार्थना करतो. बण्डा जोशी यांनी याड लागल हे विंडबनात्मक काव्य सादर केले.संचालक प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.आभार सहकार्यवाह उदय काळे यांनी मानले. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, सहकार्यवाह उदय काळे,उपाध्यक्ष अजित रेखी, डॉ.राजा ठाकूर, राहुल तांबोळी, किरण आगरवाल, संजय चोपडा, निमंत्रित सदस्य चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, व माजी ग्रंथपाल संजय लिहिणे, प्रा.मेधा काळे, वाचक, सभासद, कर्मचारी वर्ग व रसिक उपस्थित होते.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प २ रे बुधवार २९ मे, २०१९ :**

**<u>वक्ते : मा. डॉ. आनंद काटीकर, विषय - भाषा आणि संस्कृती.</u>**

अहमदनगर जिल्हा वाचनालय आयोजित केलेल्या वसंत व्याखांनमालेत डॉ आनंद काटीकर यांनी दुसरे पुष्प गुंफले त्यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड,उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, किरण आगरवाल,दिलीप पांढरे, निमंत्रित सदस्य कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, वाचक, सभासद, कर्मचारी वर्ग व रसिक श्रोते उपस्थित होते. संस्कृती ही भाषेला दिशा देणारी असते. तुमचा भूगोल त्यावर परिणाम करणारा असतो. म्हणून भाषा व संस्कृती भूगोलाने घडते.माणसाला बोलण्याचा इतिहास ७० हजार वर्षापूर्वीचा आहे.तर माणसाचा लिखित इतिहास १० हजार वर्षापूर्वीचा आहे.असे प्रतिपादन राज्य मराठी विकास परिषदेचे संचालक व प्रमुख व्याखाते डॉ.आनंद काटीकर यांनी केले.प्रास्ताविक प्रा.शिरीष मोडक यांनी केले.पाहुण्याचा परिचय उपाध्यक्ष अजित रेखी यांनी करून दिला.आभार निमंत्रित सदस्य गणेश अष्टेकर यांनी मानले.सूत्रसंचालन शिल्पा रसाळ यांनी केले.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प ३ रे गुरुवार ३० मे, २०१९ :**

<u>**वक्ते : मा. श्री. प्रमोद केणे** विषय - **गिरनार यात्रा : दिव्य अनुभव.**</u>

अहमदनगर जिल्हा वाचनालय आयोजित केलेल्या वसंत व्याखांनमालेत मा. श्री. प्रमोद केणे यांनी तिसरे पुष्प गुंफले त्यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड,उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, किरण आगरवाल,दिलीप पांढरे, निमंत्रित सदस्य कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, वाचक, सभासद, कर्मचारी वर्ग व श्रोते उपस्थित होते. अंतःकरणातील षडरिपुंचा नाश करण्यासाठी नामस्मरण करणे महत्वाचे आहे. नामस्मरणामुळे ईश्वराच्या जवळ जाता येते. देव आपल्या अंतःकरणात आहे,पण आपण देवाच्या शोधात कस्तुरीमृगासारखे फिरत असतो.नामस्मरणाच्या साधनेमुळे परमसुखाची व परमानंदाची जाणीव होते,असे प्रतिपादन दत्तभक्त प्रमोद केणे यांनी केले.गिरनार हे चैतन्यमय स्थान आहे.तेथील दत्तधुनी ही दत्त महाराजांच्या अस्तित्वाची साक्ष देते.पाच पौर्णिमा गाणगापूरला गेल्यानंतर सहाव्या पौर्णिमेला गिरनारला ये असा आदेश मला गुरूकडून मिळाला.गिरनाथ यात्रा करतांना अनेक आलेल्या अडचणीवर श्री दत्त महाराजामुळे मात करु शकतो. या वेळी प्रमोद केणे यांनी साक्षात अनघालक्ष्मी बाल्यावस्थेतील दत्तगुरू, ६४ योगिनीचे दर्शन कसे घडले याचे अनुभव कथन केले, त्यावेळी श्रोते मंत्रमुग्ध झाले.सूत्रसंचालन उपाध्यक्ष अजित रेखी यांनी केले आभार संचालक दिलीप पांढरे यांनी मानले.

*** वसंत व्याख्यानमाला पुष्प ४ थे शुक्रवार ३१ मे, २०१९ :**

<u>**वक्ते : मा.प्रा.हेमंत मोने. विषय - कॅलेंडर व पंचांगातील गमतीजमती**</u>

अहमदनगर जिल्हा वाचनालय आयोजित केलेल्या वसंत व्याखांनमालेत मा.हेमंत मोने यांनी चौथे पुष्प गुंफले त्यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्प हार अर्पण केला.यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड,उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, किरण आगरवाल,दिलीप पांढरे, निमंत्रित सदस्य कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, वाचक, सभासद, कर्मचारी वर्ग व श्रोते उपस्थित होते. आपल्या देशाची राष्ट्रीय दिनदर्शिका आहे,पण दुर्देवाने त्याविषयीची माहिती आज कोणालाही नाही. १९५२ मध्ये केंद्र सरकारने कॅलेंडर रिफॉर्म समितीची स्थापना केली होती. या समितीने राष्ट्रीय दिनदर्शिकेची निर्मिती केली होती,असे प्रतिपादन खगोलतज्ञ प्रा.हेमंत मोने यांनी केले.डॉ.मेघनाथ शहा राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या कॅलेंडर रिफॉर्म समितीचे अध्यक्ष होते. २२ मार्च १९५७ रोजी संसदने राष्ट्रीय दिनदर्शिकेला मान्यता दिली.सौरवर्ष व सौरतारीख

हे कॅलेंडरचे वैशिष्टय आहे. चंद्र व सूर्य यांच्यामुळे दिनदर्शिकेचे सौर दिनदर्शिका व चंद्र दिनदर्शिका असे दोन प्रकार पडतात. पंचागात द्त्तयोग, अमृतसिद्धीयोग, पुष्प्योग, असे विविध योग आहेत.हे योग नक्षत्रावर ठरतात.व्याखांनमालेचे अखेरचे पुष्प प्रा. हेमंत मोने यांनी गुंफले. सूत्रसंचालन उपाध्याक्षा शिल्पा रसाळ यांनी केले. आभार गणेश अष्टेकर यांनी मानले.

*** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी**

**गुरुवार ०१ ऑगस्ट, २०१९ :**

अहवाल वर्षात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त वाचनालयाच्या वतीने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा शालेय गट व खुला गट अशा दोन गटांत झाली. प्रारंभी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी प्रमुख मान्यवरांचे भाषण झाले त्यांनी लो.टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील घटनांना उजाळा दिला या कार्यक्रमा प्रसंगी सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***अहमदनगर जिल्हा वाचनालय अयोजित शालेय चित्रकला स्पर्धा शनिवार १० ऑगस्ट, २०१९**

दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षात अ.जि.वा. वतीने शालेय चित्रकला स्पर्धा भरविण्यात आली होती. ही स्पर्धा २ री व ३ री व गट ४ थी व ५ वी या दोन गटात घेण्यात आली. यात शहरातील जास्तीत जास्त शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी उद्घाटन प्रा. शिरीष मोडक यांच्या हस्ते झाले. उपस्थित प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, खजिनदार तन्वीर खान, सह कार्यवाह डॉ.राजा ठाकूर, संयोजक किरण आगरवाल, संचालक दिलीप पांढरे, प्रा.ज्योती कुलकर्णी, राहूल तांबोळी, डॉ. राजा ठाकूर, अनिल लोखंडे, संजय चोपडा, अनंत देसाई, डॉ. शैलेंद्र पाटणकर, कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, जीडी आर्ट्सचे शिक्षक वर्ग, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***चित्रकला व निबंध स्पर्धेचा परितोषिक वितरण समारंभ,शनिवार ११ ऑगस्ट २०१९**

अजिवा च्या वतीने घेण्यात आलेल्या लो.टिळकांच्या जीवनावरील निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम लो.टिळक सभागृहात थाटात व उत्साहात पार पडला. कलेतून मिळालेले प्रोत्साहन प्रेरणादायी शालेय जीवनातील स्पर्धा व त्यामधून वृद्धिंगत होणारी कला ही खऱ्या अर्थाने समृद्ध करणारी असल्याचे प्रतिपादन मर्चंटस बँकचे अध्यक्ष सीए अजय मुथा यांनी केले. लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त निबंध स्पर्धा तसेच

चित्रकला स्पर्धेच्या पारतोषिक वितरण समारंभप्रसंगी सीए मुथा बोलत होते. पुढे बोलताना सी ए मुथा म्हणाले, चांगले लिहिण्यासाठी व चांगले बोलण्यासाठी प्रथम चांगले वाचन करणे आवश्यक आहे. चांगल्या वाचनाची भूक जिल्हा वाचनालय पूर्ण करते. शालेय विद्यार्थांवर वाचनाचे संस्कार होणे महत्वाचे आहे, प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी स्वागत करतांना वाचनालय सातत्याने विविध उपक्रमातून संस्कारीत पिढी घडविण्याचा यशस्वी प्रयत्न करत असल्याचे सांगितले.प्रा.शिरीष मोडक यांनी अध्यक्षीय भाषणात १८१ वर्षाची परंपरा लाभलेल्या जिल्हा वाचनालयाच्या माध्यमातून हजारो कलाकार, लेखक, साहित्यिक घडले आहेत. वाचनालयाच्या स्पर्धेतून उगवती पिढी कला, विचार व संस्काराने समृद्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.यावेळी स्पर्धेचे परिक्षक सुनील राऊत, प्रा.दया जेठे, चित्रकार अशोक डोळसे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, सहकार्यवाह डॉ.राजा ठाकूर उपाध्याक्षा शिल्पा रसाळ खजिनदार तन्वीर खान,संचालक किरण आगरवाल, दिलीप पांढरे, राहुल तांबोळी, गणेश अष्टेकर, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, माजी ग्रंथपाल संजय लिहिणे उपस्थित होते. सूत्रसंचालन उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, व निकाल वाचन गणेश अष्टेकर यांनी केले. खजिनदार तन्वीर खान यांनी आभार मानले.

**<u>स्पर्धेचा निकाल</u>** :- **निबंध स्पर्धेतील लहान गटात प्रथम क्रमांक** - रोहन आमोद नलगे, **व्दितीय क्रमांक** - धनश्री विठ्ठल चेमटे, **तृतीय क्रमांक** - तनया संतोष चेमटे. **खुला गट**, **प्रथम क्रमांक** - सौ.स्नेहल संजय छाजेड, **व्दितीय क्रमांक** - शेख मिराबक्ष खुदाबक्ष, **तृतीय क्रमांक** - गायत्री संदीप गुंड, ***<u>चित्रकला स्पर्धेत पहिल्या गटात</u>*** <u>:- **(इयत्ता २ री ते ३ री )**</u> **प्रथम क्रमांक** :- अरुजा अभय दिघे, **व्दितीय क्रमांक -** तन्मय मनोहर गोरे, **तृतीय क्रमांक**- धनिष्का आनंद गुगळे, गट क्रमांक २ :- **प्रथम क्रमांक** - आर्या सुनिल निंबाळकर, **व्दितीय क्रमांक** - प्राजक्ता प्रसाद सैंदाणे, **तृतीय क्रमांक** - अविंशा विवेक मंत्री.

## *१५ ऑगस्ट २०१९ स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण, गुरुवार १५ ऑगस्ट,२०१९ :

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिना निमित्त वाचनालया मध्ये ध्वजारोहण आयोजित करण्यात आले होते. सह कार्यवाह डॉ.राजा ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. या वेळी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, किरण आगरवाल, राहुल तांबोळी, अनंत देसाई प्रा. ज्योती कुलकर्णी, व ग्रंथपाल अमोल इथापे व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

***अजिवा आयोजित कै.पद्माकर डावरे स्मृति विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ : - शनिवार ३१ ऑगस्ट २०१९**

केवळ छंद नव्हे तर ध्यास घेऊन लेखन करा. चांगल्या लेखनासाठी चांगले वाचन करणे आवश्यक आहे. हौस म्हणून लेखन करू नये. तर गांभीर्याने लेखन करावे. विनोदी लेखन करणे अवघड आहे. विनोदाकडे देखील गंभीरतेने पहावे, असे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यिक सदानंद भणगे यांनी केले. कै. पद्माकर डावरे स्मृति प्रित्यर्थ राज्यस्तरीय मराठी विनोदी लघुकथा लेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्याचे पारितोषिक वितरण समारंभ साहित्यिक सदानंद भणगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा.शिरीष मोडक होते. या प्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, संचालक किरण आगरवाल, दिलीप पांढरे, प्रा. मेधा काळे प्रा. ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, निमंत्रित सदस्य गणेश अष्टेकर, नगरमधील उद्योजक रवींद्र डावरे यांनी वाचनालयाकडे २५ हजार रुपये ठेव ठेवली आहे. त्यातून या स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष आहे. प्रास्तविक प्रा.शिरीष मोडक यांनी केले. सूत्रसंचालन उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, संचालक दिलीप पांढरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या प्रसंगी परीक्षक सौ. सविता काळे यांचा सत्कार करण्यात आला. उदोजक व स्पर्धेचे प्रायोजक रविंद्र डावरे यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. आभार गणेश अष्टेकर यांनी मानले. मराठी विनोदी लघुकथा लेखन स्पर्धेत डॉ. श्रीकांत नाडगौडा (पुणे) यांनी प्रथम क्रमांक (३ हजार शंभर रुपये व ट्रॉफी ) पटकाविला. व्दितीय विभागून - प्रदीप जोशी, विजय जाधव (जालना ) (२ हजार शंभर रुपये व ट्रॉफी) तृतीय- रत्नाकर सातपुते (१ हजार पाचशे व ट्रॉफी) उत्तेजानर्थ - रेखा विनायक नाबर ( मुंबई ) (५०० रुपये ) व वंदना शिवलकर ( नगर ) (५०० रुपये )यांना मिळाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, सौ. वर्षा जोशी, कुमार गोटला, संकेत फाटक, संजय गाडेकर, विठ्ठल शहापूरकर यांनी परिश्रम घेतले.

***श्री गणेश चतुर्थी, सोमवार ०२ सप्टेंबर, २०१९ :**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात श्री गणेश मूर्तीची स्थापना श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी करण्यात आली. संचालक दिलीप पांढरे यांच्या हस्ते श्री मूर्तीची स्थापना करून पूजा करण्यात आली. संचालक किरण आगरवाल यांनी आकर्षक सजावट केली. वाचनालयाचे कर्मचारी कुमार गोंटला यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली. या प्रसंगी उपाध्यक्ष श्री. अजित रेखी, श्री.दिलीप पांढरे, श्री. अनिल लोखंडे सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद व वाचक उपस्थित होते.

***अहमदनगर जिल्हा वाचनालयात डॉ. आडकर हिंदी कक्षाची स्थापना सोमवार १६ सप्टेंबर, २०१९**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात हिंदी सृजन सभेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या डॉ. शंकर केशव आडकर हिंदी कक्षाचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी माजी आमदार अनिलभैय्या राठोड, हिंद सेवा मंडळाचे आणि अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, डॉ.शरद कोलते, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, डॉ.सुरेशकुमार जैन, डॉ.विश्वास काळे, डॉ. सुरेश बाबर, डॉ.रिचा शर्मा, वाचनालयाचे उपाध्यक्ष अजित रेखी, उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, आदी उपस्थित होते. हिंदी सृजन सभेच्या वतीने वाचनालयास हिंदी पुस्तकांसाठी बुक शेल्फ व हिंदी पुस्तके भेट देण्यात आली. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सारस्वत सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिरीष मोडक होते. प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.निमसे उपस्थित होते. डॉ.कोलते, नगर महाविद्यालयातील माजी हिंदी विभागप्रमुख डॉ. मोहमद आझम, सारडा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, नगर महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे माजी प्रमुख डॉ.देवीप्रसाद खरवंडीकर, विख्यात अनुवादक प्रा. लछमन हर्दवाणी यांचा मानपत्र देऊन यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. डॉ. आडकर यांच्या प्रतिमा पूजनाने व सरस्वती वंदनेने कार्यक्रमाला सुरवात झाली. डॉ. ऋचा शर्मा यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. प्रा. अशोक घोरपडे, प्राचार्य डॉ. अमरजा रेखी, डॉ. विश्वास काळे. डॉ. सुरेश जैन, प्रा. आनंद त्रिपाठी, डॉ. सुनीता मोटे यांनी मानपत्राचे वाचन केले. सत्कारास उत्तर देताना मान्यवरांनी हिंदी सृजन सभेच्या उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. कोलते म्हणाले, सृजन सभेचे सर्व सभासद मोठेपण असतानाही आपले पाय जमिनीवरच ठेवणारे आहेत. साक्षात सरस्वती प्रसन्न असूनही विनम्र आहेत. डॉ.निमसे म्हणाले नगर सारख्या शहरात हिंदीप्रेमी सृजन सभा कौतुस्कापद कार्य करत आहे. प्रा.आडकर अहमदनगर महाविद्यालयात कार्यरत होते, तो काळ महाविद्यालयाचा सुवर्णकाळ होता. त्यावेळी नगर कॉलेजचा नावलौकिक केवळ राज्यातच नव्हे, तर संपूर्ण देशात होता, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. प्रा. शिरीष मोडक यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिंदी संस्थेचे सर्व सभासद तसेच हिन्दी संस्थेचे सर्व सभासद,तसेच राजीव शर्मा व हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. पौर्णिमा बेहरे यांनी केले. प्रा.सोमनाथ नजान यांनी आभार मानले.

***श्री गणेश विसर्जन,गुरुवार २३ सप्टेंबर, २०१९ :-**

श्री पार्थिव गणपती विसर्जन, श्री गणेश पूजन, उत्तरपूजा, महाआरती, संचालक किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, दिलीप पांढरे, अनिल लोखंडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली व गणपती विसर्जन सीना नदी येथे करण्यात आले. या वेळी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***महात्मा गांधी जयंती,लालबहादूर शास्त्री जयंती बुधवार २ ऑक्टोबर २०१९ :-**

अहवाल वर्षात अहमदनगर जिल्हा वाचनालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळेस वाचनालयाचे संचालक किरण आगरवाल दिलीप पांढरे, गणेश अष्टेकर, चंद्रकांत पालवे व सभासद, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

***वाचन प्रेरणा दिन, मंगळवार १५ ऑक्टोबर, २०१९ :**

जागतिक किर्तीचे शास्त्रज्ञ व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिना निमित्त आयोजित वकृत्व स्पर्धेत शैला सोनवणे व सृष्टी जाधव यांनी विविध गटात प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेचा पारोतिषिक वितरण समारंभ जेष्ठ लेखिका व वाचनालयाच्या संचालिका प्रा. मेधा काळे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांच्या हस्ते झाला. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांनी जिल्हा वाचनालय गेली दोन सातत्याने वाचन संस्कृतीसाठी केलेले कार्य लोकाभिमुख व वाचन संस्कृतीत प्रेरणा देणारे असल्याचे सांगितले. प्रा.मेधा काळे यांनी यावेळी बोलताना वाचनातून मिळणारी प्रेरणा व संस्कार आदर्श, सुदृढ समाज निर्मितीस पोषक आहेत. स्पर्धेच्या माध्यमातून वाचकांना मिळणारी प्रेरणा कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन केले. प्रा. शिरीष मोडक यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्व सांगून गेली अनेक दशके हे कार्य अविरतपणे चालू असल्याचे सांगितले. स्पर्धेचे उद्घाटन ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, दिलीप पांढरे, प्रा.ज्योती कुलकर्णी, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, परिक्षक सौ. स्वाती देशमुख, विकास पटवर्धन कर्मचारी वर्ग वाचक सभासद उपस्थित होते. प्रेरणा दिनाचे औचित्य साधून दुपारच्या सत्रात साहित्यिका मेधा काळे यांची प्रकट मुलाखत निवेदिका शिल्पा रसाळ यांनी घेतली वाचन संस्कृतीवरील प्रा.मेधा काळे यांचे अनुभवांनी उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. सर्वांचे स्वागत प्रा.शिरीष मोडक यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले.गणेश अष्टेकर यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे- वयोगट (कुमार)** प्रथम - सृष्टी प्रितम जाधव, व्दितीय - अनिकेत ढमाले व रोहित गुगळे, तृतीय - अक्षदा वडणीकर, शुभांगी बाबर, उत्तेजानर्थ - महेश लगड, श्रद्धा सुरामे. **वयोगट (खुला गट)** प्रथम - शैला सोनवणे, व्दितीय - अशोक सप्तर्षी, तृतीय - विठ्ठल पाठक व रामविलास हेडा.

## *दिवाळी अंकाचे वितरण, गुरुवार २४ ऑक्टोबर, २०१९ :

दिवाळीमध्ये वाचनालयाच्या वाचकांसाठी दिवाळी अंक वितरण चा शुभारंभ २४ ऑक्टोबर २०१९ रोजी उद्योजक महेश देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक व कार्यवाह विक्रम राठोड यांनी वाचनालय करत असलेल्या समाजउपयोगी कामाची माहिती उपस्थितांना दिली. वाचनालयास ज्या व्यक्ती संस्था सहकार्य करीत आहेत त्यांचे कौतुक या वेळी करण्यात आले. या समारंभास उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, संचालक किरण आगरवाल,राहूल तांबोळी, दिलीप पांढरे, प्रा. ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, उद्योजक नंदू आढाव, सागर शर्मा, अशोक दाणी, सुरेश मैड, प्रसाद तांदूळवाडकर, अभिजित भळगट, रमाकांत बर्डे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल नितीन भारताल अनेक वाचक कर्मचारी वृंद कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

## *राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन, शनिवार २५ जानेवारी, २०२० :

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त २५ जानेवारी रोजी वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात राष्ट्रीय स्फूर्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन गटात या स्पर्धा संपन्न झाल्या नंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ झाला. या वेळी प्रमुख पाहूणे हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी उपस्थित होते. प्रथम लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. देशात सातत्याने होत जाणारी तंत्रज्ञानाची प्रगती व त्या बळावर उगवत्या पिढीकडून पाहिली जाणारी महासत्तेची भारताची स्वप्ने ही आशा स्थान आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या या स्पर्धेत वैयक्तिक प्रगतीबरोबर आपला समाज व देश यांच्यावरील आत्मियता व प्रेम वृंद्धीगत होण्यासाठी वाचनालयाच्या स्फूर्तिगीत स्पर्धा प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांनी केले. यावेळी जिल्हा निरीक्षक सपंत वाकचौरे, अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक रणजीत श्रीगोड, हिंद मंडळाचे अजित बोरा,उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, उपाध्यक्ष अजित रेखी, संचालक किरण आगरवाल,राहुल तांबोळी, दिलीप पांढरे, प्रा. मेधा काळे, प्रा.ज्योती कुलकर्णी, गणेश अष्टेकर, बी.यु.कुलकर्णी, परिक्षक सौ. उज्वला जोशी, सौ. रागिणी देशमुख, ग्रंथपाल अमोल इथापे सहा.ग्रंथपाल नितीन भारताल उपस्थित होते. या वेळी सपंत वाकचौरे यांनी वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना वाचनालयाचे मोफत सदस्यत्व देण्याची सूचना केली. प्रा. शिरीष मोडक यांनी ही सूचना मान्य केली.

यावेळी उपस्थितांचा सन्मान वाचनालयाच्यावतीने करण्यात आला. स्पर्धेचे निकाल वाचन गणेश अष्टेकर यांनी तर आभार प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सर्व संचालक मंडळ, स्पर्धा संयोजन समिती वाचनालयाचे कर्मचारी पल्लवी कुक्कडवाल, अलका घबाडे, वर्षा जोशी, विठ्ठल शहापुरकर, संजय गाडेकर, कुमार गोंटला, संकेत फाटक, सिकंदर शेख यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - **(लहान गट )** **प्रथम क्रमांक -** बाई इचरजबाई फिरोदिया, **व्दितीय क्रमांक -** ज्ञानसंपदा इंग्लीश मेडियम स्कुल, सावेडी, **तृतीय क्रमांक** - रेणावीकर विद्यालय, सावेडी, **उत्तेजानर्थ -** नवीन मराठी शाळा, विश्रामबाग, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लीश मेडियम स्कुल, सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूल. **(मोठा गट)** - **प्रथम क्रमांक** पोतदार इंटरनॅशनल स्कूल, केडगाव, **व्दितीय क्रमांक -** भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, **तृतीय क्रमांक** - भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, **उत्तेजानर्थ** - समर्थ विद्या मंदिर, सांगळे गल्ली, ज्ञानसंपदा इंग्लीश मेडियम स्कुल, सावेडी, ग. ज. चिंताबर विद्या मंदिर, **विशेष पारितोषिक -** किशोर संस्कृत, महिला मंडळ बालक मंदिर यांचा समावेश आहे. सर्व विजेत्या संघांना करंडक व सहभागीना वैयक्तिक सन्मानचिन्हे देण्यात आली. यावेळी विविध शाळांचे शिक्षक, पालक व नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते.

### ⁕गणराज्य दिन साजरा, रविवार २६ जानेवारी, २०२० :

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वाचनालयात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. ध्वजारोहण उपाध्यक्ष श्री. अजित रेखी यांच्या हस्ते पार पडले या प्रसंगी उपाध्यक्षा शिल्पा रसाळ, संचालक श्री.दिलीप पांढरे, अनिल लोखंडे, किरण आगरवाल, प्रा. ज्योती कुलकर्णी, गणेश अष्टेकर, राहूल तांबोळी, ग्रंथपाल अमोल इथापे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### ⁕ मराठी राजभाषा दिन,गुरुवार २७ फेब्रुवारी, २०२० :

अहवाल वर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठीचे वैभवशाली साहित्याचे लेखक वि. वा. शिरवाडकर कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा वाचनालयाच्या संचालिका व जेष्ठ साहित्यक मेधा काळे यांच्या हस्ते कवी कुसमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रा. मेधा काळे म्हणाल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी आपण आग्रही असणे जरुरीचे आहे. मराठी भाषेला दोन हजार वर्षाचा इतिहास आहे. त्यामुळे मराठी वाचणे, बोलणे, लिहिणे, तसेच व्यवहारामध्येही मराठीचा वापर करणे गरजेचे आहे. प्रास्ताविकात उपाध्याक्षा शिल्पा रसाळ यांनी कुसमाग्रजांच्या साहित्यकृतीचा

आढावा घेत मराठी भाषा अनिवार्य असावी या विषयी प्रतिपादन केले. या वेळी वाचनालयाच्या उपाध्याक्षा शिल्पा रसाळ, संचालक दिलीप पांढरे, किरण आगरवाल, अनिल लोखंडे, निमंत्रित सदस्य चंद्रकांत पालवे, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे, वाचक सभासद डॉ.दगडे रविंद्र उपस्थित होते. यावेळी वाचनालयात असणाऱ्या कुसमाग्रजांच्या विविध साहित्य संपदेचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. वाचकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. गणेश अष्टेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी कर्मचारी पल्लवी कुक्कडवाल, अलका घबाडे, वर्षा जोशी, कुमार गोंटला, संकेत फाटक, सिकंदर शेख, विठ्ठल शहापूरकर यांचे सहकार्य लाभले.

**⁕ जागतिक महिला दिन, रविवार ०८ मार्च, २०२० :**

अहमदनगर जिल्हा वाचनालय येथे महिला दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. तसेच अ.जि.वा.महिला कर्मचारी व सावेडी वाचनालयातील महिला कर्मचारी तसेच कर्तव्य दक्ष महिलांचा पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. वाचनालयाच्या उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांच्या हस्ते महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्षा शिल्पा रसाळ यांनी केले. या प्रसंगी संचालक अनिल लोखंडे, किरण आगरवाल, गणेश अष्टेकर, ग्रंथपाल अमोल इथापे व कर्मचारी वृंद उपस्थित होते. अशा प्रकारे महिला दिन संपन्न झाला.

अहमदनगर जिल्हा वाचनालयात दाखल झालेल्या ग्रंथांचा तपशील

# सन २०१७ - २०१८ ते २०१९ - २०२०

| सन | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१७ - २०१८ | १,२१३ | ३ | ५६ | १,२७२ |
| २०१८ - २०१९ | ९८२ | - | १९६ | १,१७८ |
| २०१९ - २०२० | १२०४ | - | २७७ | १४८१ |

| | | |
|---|---|---|
| वाचनालयातील सन २०१८-२०१९ अखेर ग्रंथ संख्या | - | १०,६३१८ |
| वाचनालयातील सन २०१९-२०२० मधील ग्रंथ खरेदी | - | १,०७२ |
| वाचनालयातील सन २०१९-२०२० देणगी ग्रंथ संख्या | - | ४०९ |
| एकूण | - | १०,७७९९ |

## सन २०१९- २०२० वर्षात वाचनालयात घेण्यात आलेली नियतकालिके

| अ.नं. | नियतकालिके | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | दैनिके | १५ | ०१ | ०३ | १९ |
| २. | साप्ताहिके | ५ | ०१ | ०४ | १० |
| ३. | पाक्षिके | ०१ | ०२ | ९ | १२ |
| ४. | मासिके | ३७ | १० | १२ | ५८ |
| ५. | त्रैमासिके | - | - | - | - |
| ६. | वार्षिके | १७१ | - | - | १७१ |
| ७. | ब्रेल | ०२ | - | - | ०२ |
| | | | - | | |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय ( विश्वस्त संस्था )

सन २०१९-२०२० मधील ग्रंथ देणगीदार

| अ.नं. | देणगीदारांचे नाव | मराठी | इंग्रजी | हिंदी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | राजाराम मोहन रॉय फौंडेशन | - | २७७ | - | २७७ |
| २. | केळकर कौस्तुभ | ०१ | - | - | ०१ |
| ३. | भारतीय भाषा संस्थान उच्चतर शिक्षा विभाग,मानव संसाधन,विकास मंत्रालय | ३८ | - | - | ३८ |
| ४. | शिल्पा सरदेसाई | २८ | - | - | २८ |
| ५. | म्हस्के सुभाष | ०१ | - | - | ०१ |
| ६. | वारे धनंजय | ०२ | - | - | ०२ |
| ७. | बर्डे संजीवनी रमाकांत | २८ | - | - | २८ |
| ८. | कुक्कडवाल पल्लवी, जोशी वर्षा | १७ | - | - | १७ |
| ९. | शिंदे पी. आर. | ०३ | - | - | ०३ |
| १०. | पोतदार बबन | ०२ | - | - | ०२ |
| ११. | देशमुख महेश | ०२ | - | - | ०२ |
| १२. | यशवंत सामाजिक प्रतिष्ठान | ०१ | - | - | ०१ |
| १३. | ॲड. पोकळे लक्ष्मण | ०१ | - | - | ०१ |
| १४. | गोरे अनिल | ०१ | - | - | ०१ |
| १५. | कालगावकर अरविंद | ०१ | - | - | ०१ |
| १६. | पाठक प्रमोद | ०१ | - | - | ०१ |
| १७. | फडके सुधीर | ०१ | - | - | ०१ |
| १८. | देशपांडे पद्माकर | ०१ | - | - | ०१ |
| १९. | गोरे सखाराम | ०४ | - | - | ०४ |
| | एकूण | १३२ | २७७ | | ४०९ |

## सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !

## *वाचनालयात देणगी येणारे वाचन साहित्य*

१. प्रतोद, २.प्रिय रसिक ३. सुवार्ता, ४. सत्यप्रकाश, ५. कामगार जगत, ६.सा.सोधन, ७.संवाद, ८.महा.शासन राजपत्र, ९.सनातन चिंतन, १०.लोकमंथन, ११.आर्य जगत, १२.संस्था जगत, १३. चालू घडामोडी वार्ता, १४.वेद वार्ता, १५.नगर संकेत, १६.नोकरी वय. मार्गदर्शक, १७.थेऑसोफिस्ट, १८.सर्व्हिस फॉर कम्युनिकेटरर्स, १९.शब्द, २०.जागृती, २१.ज्ञानधारा, २२.ऋषीप्रसाद, २३.पुणे पोस्ट, २४.लोकमंथन, २५.वास्तूसंस्कृती, २६.रणधैर्य, २७.नवनीत (हिंदी), २८.हंस (हिंदी) २९.वागर्थ, ३०.नया ज्ञानोद्य, ३१.नगर वेध, ३२.रायगडचा युवक, ३३.नवी आशा दिशा, ३४ सूर्यधर्म, ३५ संत नगर टाईम्स,३६.सेल्फ डेव्हलपमेंट.३७.नवशक्ती,३८.फ्री जनरल प्रेस

सर्व देणगीदारांचे वाचनालयातर्फे आभार !

## अहमदनगर जिल्हा वाचनालयसन २०२० - २०२१ चे अंदाजपत्रक

| जमा | |
|---|---|
| नं खात्याचे नाव | रक्कम |
| १. वर्गणी व प्रवेश फी | ८,००,०००=०० |
| २. नुकसान भरपाई | ४,०००=०० |
| ३. ज्यादा/इतर फी | ७,०००=०० |
| ४. अनुदान महाराष्ट्र सरकार | ७,२०,०००=०० |
| ५. साधन सामुग्री अनुदान | ३५,०००=०० |
| ६. देणगी रोख व पुस्तकरूपाने | १,५०,०००=०० |
| ७. रद्दी विक्री | २०,०००=०० |
| ८. स्पर्धा प्रवेश फी | १०,०००=०० |
| ९. तुट | ३,०००=०० |
| एकूण रक्कम | रु.१,७४,९०००=०० |

| खर्च | |
|---|---|
| नं खात्याचे नाव | रक्कम |
| १. टेलिफोन खर्च | २०,०००=०० |
| २. दिवाळी बोनस | ३०,०००=०० |
| ३. सेवकवर्ग पगार | ८,५०,०००=०० |
| ४. टपाल वर्ग | १,०००=०० |
| ५. वीज/दिवाबत्ती खर्च | ५०,०००=०० |
| ६. वृत्तपत्र मासिक, साप्ताहिक | १,५०,०००=०० |
| ७. ग्रंथ खरेदी | २,००,०००=०० |
| ८. सांस्कृतिक कार्यक्रम | ८५,०००=०० |
| ९. डेडस्टॉक रिपेअर | ७,०००=०० |
| १०. छपाई खर्च | ४०,०००=०० |
| ११. पुस्तक बांधणी | ५,०००=०० |
| १२. स्टेशनरी खर्च | १०,०००=०० |
| १३. डेडस्टॉक खरेदी | २०,०००=०० |
| १४. प्रवास खर्च | १५,०००=०० |
| १५ स्वच्छता व सफाई | २५,०००=०० |
| १६. टायपिंग व झेरॉक्स | १,०००=०० |
| १७. प्रा.फंड कॉन्ट्रीब्युशन | १५,०००=०० |
| १८. विमा | ८,०००=०० |
| १९. ऑडीट फी | ८,०००=०० |
| २०. डिपॉझिट रिझर्व फंड | ४०,०००=०० |
| २१. विश्वस्त संस्थेला अदा | २०,०००=०० |
| २२. बांधकाम फंड | २०,०००=०० |
| २३. संगणक खर्च | ४,०००=०० |
| २४. डाटा एन्ट्री चार्जेस | ५,०००=०० |
| २५.सॉफ्टवेअर खर्च | २०,०००=०० |
| २६ इन्कमटॅक्स | १,००,०००=०० |
| एकूण रक्कम | रु१,७४,९०००=०० |

## अहमदनगर जिल्हा वाचनालय, (विश्वस्त संस्थेचे)सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक

| जमा | |
|---|---|
| नं. खात्याचे नाव | रक्कम |
| १. देणगी | ३,००,०००=०० |
| २. जागा भाडे | ९,०००=०० |
| ३. आजीव सभासद | ५,०००=०० |
| ४. वाचनालयाकडून जमा | २०,०००=०० |
| ५) जाहिराती पोटी जमा | ६०,०००=०० |
| एकूण रक्कम रु. | ३,९४,०००=०० |

| खर्च | |
|---|---|
| नं. खात्याचे नाव | रक्कम |
| १. मिटिंग खर्च | १०,०००=०० |
| २. इमारत दुरुस्ती व देखभाल | २५,०००=०० |
| ३. इमारत बांधकाम | १,००,०००=०० |
| ४. स्टेशनरी खर्च | ५,०००=०० |
| ५. छपाई खर्च | ७,०००=०० |
| ६. लिगल खर्च | २५,०००=०० |
| ७. किरकोळ खर्च | ५,०००=०० |
| ८. जनसंपर्क व शिष्टाचार | ५,०००=०० |
| ९. ऑफिस खर्च | ४०,०००=०० |
| १०. प्रासंगिक खर्च | ९,०००=०० |
| ११. कार्यक्रम खर्च | ४५,०००=०० |
| १२. सावेडी वाचनालय | १,००,०००=०० |
| १३. टपाल खर्च | ५,०००=०० |
| १४. टायपिंग वझेरॉक्स खर्च | ५,००=०० |
| १५. जाहिरात खर्च | १०,०००=०० |
| १६. ट्रस्ट फंड | २,५००=०० |
| एकूण रक्कम रु. | ३,९४,०००=०० |

## अहमदनगर जिल्हा वाचनालय विश्वस्त संस्था, अहमदनगर

### जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | |
| रोख | १२,६७९.०० | |
| शहर सह. बँक बचत ठेव २९६८ | १,५६९,९७.०० | |
| शहर बँक मुदत ठेव खाते | ३१,२३,९८५.०० | ३२,९३,६६१.०० |
| देणगी | | २,७७,५००.०० |
| जागा भाडे | | ६३,५००.०० |
| बँक व्याज | | १२,०७०.०० |
| वाचनालय | | १,००,५८३.०० |
| एकूण रक्कम रुपये | | ३७,४७,३१४.०० |

| खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|
| किरकोळ खर्च | | ३,६२०.०० |
| मिटिंग खर्च | | ४,९७०.०० |
| ऑफिस खर्च | | २८,५४१.०० |
| बँक कमिशन | | २,७२.५० |
| सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | ३६,५२३.०० |
| पाहूणचार व जनसंपर्क | | २,१४०.०० |
| जाहिरात खर्च | | ९,५३३.०० |
| स्टेशनरी खर्च | | १,४७५.०० |
| टपाल खर्च | | ३,४७९.०० |
| छपाई खर्च | | ६,१५०.०० |
| टायपिंग व झेरॉक्स खर्च | | २००.०० |
| उसनवार | | |
| सावेडी वाचनालय | ७०,०००.०० | |
| अ.नगर जिल्हा वाचनालय | १०,०००.०० | ८०,०००.०० |
| अखेरची शिल्लक | | |
| रोख | ५,९७६.०० | |
| शहर सह. बँक बचत ठेव २९६८ | १४,८६६.५० | |
| शहर बँक मुदत ठेव खाते | ३५,४९,५६८.०० | ३५,७०,४१०.५० |
| एकूण रक्कम रुपये | | ३७,४७,३१४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रा.शिरीष मोडक** | **श्री.तन्वीर खान** | **श्री.विक्रम राठोड** | **श्री.के.जी.सप्तर्षी** |
| **अध्यक्ष** | **खजिनदार** | **प्रमुख कार्यवाह** | **हिशोब तपासणीस** |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| <u>आरंभीची शिल्लक</u> | | | डिपॉझिट परत | | ४१.२२५.०० |
| | | | ॲडव्हांस सेवक वर्ग | | ४०,०००.०० |
| रोख रक्कम | ५,०६९.२५ | | टेलिफोन खर्च | | १७,९४९.०० |
| मर्चंट बँक बचत खाते १७२२ | १,७४,५५२.१० | | सेवक वर्ग पगार | | ८,१७,६८०.०० |
| मर्चंट बँक प्रोव्हिंड फंड से. खाते | ४०,४७९.७४ | | टपाल खर्च | | १८७.०० |
| मुदत ठेवी प्रोव्हिंड फंड | ४.२४.३६७.०० | | वीज खर्च | | ४८,७२०.०० |
| मुदत ठेवी वाचनालय | २४,९३,००३.०० | | प्रवास खर्च | | ७,१९०.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | ४,२१,९७२.५० | ३५,५९,४४३.५९ | छपाई खर्च | | ३३,९२७.०० |
| | | | वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके इ | | १,०९,८२४.०० |
| <u>देणगी</u> | | | | | |
| रोख | २,०००.०० | | | | |
| पुस्तक रूपाने | १,८८,१०६.०० | १,९०,१०६.०० | <u>ग्रंथ खरेदी</u> | | |
| | | | रोख | १,८०,४६७.०० | |
| <u>अनुदान</u> | | | देणगी रूपाने | १,८८,१०६.०० | ३,६८,५७३.०० |
| महाराष्ट्र सरकार | | ५,०७,५१३.०० | | | |
| | | | झेरॉक्स व टायपिंग खर्च | | २४०.०० |
| <u>रीसिटस</u> | | | लेखनसामुग्री खर्च | | ५,६४४.०० |
| वर्गणी | ६,५८,५८६.०० | | डेडस्टॉक दुरुस्ती | | ६,१२५.०० |
| प्रवेश फी | ७,५७०.०० | | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | | ७६,०८२.०० |
| स्पर्धा प्रवेश फी | ८,१३०.०० | | प्रॉ.फंड वर्गणी | | १०,९०७.०० |
| व्यक्तिमत्व विकास शिबीर फी | ७७०.०० | | विमा | | ६,९३५.०० |
| नुकसान भरपाई | ९७०.०० | ६,७६,०२६.०० | बँक कमिशन | | ३७१.७० |
| | | | स्वच्छता व सफाई | | २३,६४८.०० |
| | | | सॉफटवेअर खर्च | | १८,२६५.०० |
| | | | पुस्तक बांधणी | | २,६००.०० |
| रद्दी विक्री | | ५,६१०.०० | ऑडिट फी | | ७,०००.०० |
| डिपोझिट | | ७६,०८५.०० | प्रॉ.फंड परत | | ६४,७८५.७४ |
| इतर जमा | | ३,०७५.०० | संगणक खर्च | | ३,५३०.०० |
| बँक व्याज | | २,२०,५४५.०० | डेडस्टॉक खरेदी | | १०,०५०.०० |
| ॲडव्हानस सेवक वर्ग | | २०,०००.०० | | | |
| प्रा.फंड सेवक वर्ग | | ४५,२५०.०० | | | |
| <u>कर्ज</u> | | | <u>अखेरची शिल्लक</u> | | |
| विश्वस्त संस्था | | १०,०००.०० | रोख | १०,६१२.२५ | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | १५,२९०.९० | |
| | | | मर्चंट बँक प्रॉव्हिडंड फंड से.खाते | ५.०७०,०० | |
| | | | मुदत ठेवी प्रॉव्हिडंड फंड | ४,४०,५४१.०० | |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | २९,६९,५२१.०० | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | १,५१,१६०.०० | ३५,९२,१९५.१५ |
| एकूण रक्कम रुपये | | ५३,१३,६५३.५९ | एकूण रक्कम रुपये | | ५३,१३,६५३,५९ |

**प्रा.शिरीष मोडक** — **अध्यक्ष**

**श्री.तन्वीर खान** — **खजिनदार**

**श्री.विक्रम राठोड** — **प्रमुख कार्यवाह**

**श्री.के.जी.सप्तर्षी** — **हिशोब तपासणीस**

## सावेडी वाचनालय, अहमदनगर

### जमा व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० अखेरचे

| जमा | रक्कम रुपये | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | डिपॉझिट परत | | ७,८००.०० |
| आरंभीची शिल्लक | | | जागा भाडे | | ७२,०००.०० |
| रोख | ६,२८९.०० | | ग्रंथ खरेदी ( रोख) | | २३,६८६.०० |
| शहर सहकारी बँक | ९,७९९.५० | १६,०८८.५० | कार्यक्रम खर्च | | ६२०.०० |
| | | | स्टेशनरी खर्च | | ४,९३३.०० |
| वर्गणी | | १,५६,६४०.०० | वीज खर्च | | २,८८०.०० |
| प्रवेश फी | | ३,७४०.०० | किरकोळ खर्च | | ३,२२५.०० |
| डिपॉझिट | | २१,४००.०० | ऑफिस खर्च | | ६,३००.०० |
| विश्वस्त संस्थेकडून जमा | | ७०,०००.०० | बँक चार्जेस | | २७२.५० |
| इतर फी | | ६,०००.०० | झेरॉक्स खर्च | | ८९५.०० |
| | | | सेवक वर्ग वेतन | | १,००,८००.०० |
| | | | पुस्तक बांधणी खर्च | | ३,४००.०० |
| | | | साफसफाई खर्च | | ६,६२५.०० |
| | | | दिवाळी बोनस | | १,८००.०० |
| | | | वृत्तपत्रे मासिक खर्च | | ९,२७०.०० |
| | | | प्रवास खर्च | | ७५०.०० |
| | | | अखेरची शिल्लक | | |
| | | | रोख | ५,३८८.५० | |
| | | | शहर सहकारी बँक | २३,२२३.५० | २८,६१२.०० |
| एकूण रक्कम रुपये | | २,७३,८६८.५० | एकूण रक्कम रुपये | | २,७३,८६८.५० |

**प्रा.शिरीष मोडक** — **अध्यक्ष**

**श्री.तन्वीर खान** — **खजिनदार**

**श्री.विक्रम राठोड** — **प्रमुख कार्यवाह**

**श्री.के.जी.सप्तर्षी** — **हिशोब तपासणीस**

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## एकत्रित उत्पन्न व खर्च पत्रक दि.०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२० अखेरचे

| खर्च | रक्कम | रक्कम | उत्पन्न | रक्कम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| <u>ट्रस्टच्या उद्दिष्टयावरील खर्च</u> | | | <u>देणगी</u> | | |
| टेलिफोन खर्च | १७,९४९.०० | | रोख | २,७९,५००.०० | |
| किरकोळ खर्च | ६,८४५.०० | | पुस्तक रूपाने | १,८८,१०६.०० | |
| सेवक वर्ग पगार | ९,१८,४८०.०० | | जागा भाडे | १२,०७०.०० | |
| टपाल खर्च | ३,६६६.०० | | | ----------------- | ४,७९,६७६.०० |
| वीज खर्च | ५१,६००.०० | | <u>अनुदान</u> | | |
| प्रवास खर्च | ७,९४०.०० | | महाराष्ट्र सरकार | | ५,०७,५१३.०० |
| छपाई खर्च | ४०,०७७.०० | | <u>रिसिटस</u> | | |
| वृत्तपत्र व मासिके साप्ताहिके इ. | १,०९,८२४.०० | | वर्गणी | ८,१५,२२६.०० | |
| स्टेशनरी खर्च | ६,४०८.०० | | प्रवेश फी | ११,३१०.०० | |
| डेडस्टॉक दुरुस्ती | ६,१२५.०० | | | ----------------- | ८,२६,५३६.०० |
| सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | १,१३,२२५.०० | | | | |
| विमा | ६,९३५.०० | | स्पर्धा प्रवेश फी | | ८,१३०.०० |
| प्रा.फंड वर्गणी | १०,९०७.०० | | नुकसान भरपाई | | ७७०.०० |
| स्वच्छता व सफाई | ३०,२७३.०० | | विलभ शुल्क | | ९७०.०० |
| पुस्तक बांधणी | ६,०००.०० | | रद्दी विक्री | | ५,६१०.०० |
| संगणक खर्च | ३,५३०.०० | | इतर जमा | | ९,०७५.०० |
| बँक कमिशन | ९१६.७० | | बँक व्याज | | ३,२१,१२८.०० |
| जागा भाडे | ७२,०००.०० | | जाहिरातीचे जमा | | ६३,५००.०० |
| झेरॉक्स व टायपिंग | १,३३५.०० | | | | |
| दिवाळी बोनस | १,८००.०० | | | | |
| ऑफीस खर्च | ३४,८४१.०० | | | | |
| लेखन सामुग्री | ५,६४४.०० | | | | |
| जाहिरात खर्च | ९,५३३.०० | | | | |
| दिवाळी अंक व मासिके | ९,२७०.०० | १४,७५,१२३.७० | | | |
| | ------------------- | | | | |
| ऑडिट खर्च | | ७,०००.०० | | | |
| व्यवस्थापण खर्च | | | | | |
| मिटिंग खर्च | ४,९७०.०० | | | | |
| पाहुणचार व जनसंपर्क | २,१४०.०० | ७,११०.०० | | | |
| | ------------------- | | | | |
| <u>घसारा</u> | | | | | |
| ग्रंथ | ३,३९,६९१.०० | | | | |
| संगणक | १५,१४८.०० | | | | |
| फर्निचर व डेडस्टॉक | ७८,१६१.०० | | | | |
| इमारत | ५४,७६५.०० | | | | |
| | ------------------- | ४,८७,७६५.०० | | | |
| चालू वर्षातील नफा ताळेबंदास वर्ग | | २,४५,९०९.३० | | | |
| **एकूण रक्कम** | | २२,२२,९०८.०० | **एकूण रक्कम** | | २२,२२,९०८.०० |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |

# अहमदनगर जिल्हा वाचनालय, अहमदनगर

## एकत्रित ताळेबंद पत्रक दि. ३१/०३/२०२० अखेरचे

| भांडवल | रक्कम रुपये | रक्कम रुपये | जिंदगी | रक्कम रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| <u>ट्रस्ट फंड</u> | | | <u>इमारत</u> | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,६३,६०८.७० | | मूळ किमंत | १४,४४,८८१.६० | |
| पुस्तक फंड | ३५,०००.०० | | अधिक नविन बांधकाम | -------------- | |
| इक्विपमेंट फंड | ६,८१९.०० | | | १४,४४,८८१.६० | |
| अनुदान इमारतीसाठी | ३७,५००.०० | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | ८,९७,२२९.६० | |
| अजीव सभासद फी | ८२,२५५.०० | ५,२५,१८२.७० | वजा घसारा चालू वर्षातील १०% | ५४,७६५.०० | ४,९२,८८७.०० |
| | | | <u>ग्रंथ</u> | | |
| रिझर्व्ह फंड | ७,२२,२९२.२० | | मूळ किमंत | ६३.२७.६९०.४० | |
| इमारत निधी | ७०,०००.०० | ७,९२,२९२.२० | अधिक नविन | ३.९२.२५९.०० | |
| <u>इतर देणे</u> | | | | ६७,१९,९४९.४० | |
| भविष्य निर्वाह निधी | ४,४५,३११,०० | | | | |
| वाचनालय डिपोझिट | १०,५५,५३१.०० | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | ४४,५५,३३८.२३ | |
| ऑडिट फी देणे | २,०००.०० | १५,०२,८४२.०० | वजा घसारा चालू वर्षातील १५ टक्के | ३,३९,६९१.०० | १९,२४,९२०.१७ |
| | | | <u>लोकमान्य टिळक पुतळा</u> | | |
| सेवक वर्ग अॅडव्हांस | | -३,०७०.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३,७१४.४५ |
| <u>उत्पन्न व खर्च खाते</u> | | | <u>संगणक</u> | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७७,८२,७२१.४४ | | मूळ किमंत | २,३२,२४०.०० | |
| अधिक चालू वर्गातील नफा | २,४५,९०९.३० | | अधिक नविन | १८,२६५.०० | |
| | | ८०,२८,६३०.७४ | | २,५०,५०५.०० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | १,८९,९१३.०० | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील २५% | १५,१४८.०० | ४५,४४४.०० |
| | | | <u>फर्निचर व डेडस्टोक</u> | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १७,४८,३८६.५० | |
| | | | अधिक नविन | १०,०५०.०० | |
| | | | | १७,५८,४३६.५० | |
| | | | वजा घसारा मागील ताळेबंदाप्रमाणे | ९,७६,८२६.१३ | |
| | | | वजा घसारा चालू वर्षातील १०% | ७८,१६१.०० | ७,०३,४४९.३७ |
| | | | <u>अॅडव्हान्स</u> | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ३,६७,९३०.०० |
| | | | <u>इतर येणे</u> | | |
| | | | महाराष्ट्र राज्य विज मंडळ | ४,०६५.०० | |
| | | | गॅस डिपॉझिट | १,४००.०० | |
| | | | जागाडिपॉझिट | २०,०००.०० | |
| | | | आयकर | ९०,८५०.०० | १,१६,३१५.०० |
| | | | <u>अखेरची शिल्लक</u> | | |
| | | | रोख वाचनालय | १०,६१२.२५ | |
| | | | रोख संस्था | ५,९७६.०० | |
| | | | रोख सावेडी वाचनालय | ५,३८८.५० | |
| | | | मर्चंट बँक बचत खाते १७२२ | १५,२९०.९० | |
| | | | मर्चंट बँक प्रोव्हिडड फंड से. खाते | ५,०७०.०० | |
| | | | मुदत ठेवी प्रोव्हिंडड फंड | ४,४०,५४१.०० | |
| | | | मुदत ठेवी वाचनालय | २९,६९,५२१.०० | |
| | | | स्टेट बँक ऑफ इंडिया से. खाते | १,५१,१६०.०० | |
| | | | शहर सह. बँक से. ठेव खाते २१६८ | १४,८६६.५० | |
| | | | शहर सह. बँक मुदत ठेव खाते | ३५,४९,५६८.०० | |
| | | | शहर सहकारी बँक सावेडी | २३,२२३.५० | ७१,९१,२१७.६५ |
| **एकूण रक्कम** | | १,०८,४५,८७७.६४ | **एकूण रक्कम** | | १,०८,४५,८७७.६४ |

| प्रा.शिरीष मोडक | श्री.तन्वीर खान | श्री.विक्रम राठोड | श्री.के.जी.सप्तर्षी |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | खजिनदार | प्रमुख कार्यवाह | हिशोब तपासणीस |